①

46/931
Saturday,March 29 ,2025
5:10 PM

# पावती

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 1223 दिनांक: 29/03/2025

गावाचे नाव: कागल
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: कगल-931-2025
दस्तऐवजाचा प्रकार : खरेदीखत
सादर करणाऱ्याचे नाव: पॉल दयानंद सोनुले

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 3200.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 700.00 |
| पृष्ठांची संख्या: 35 | |
| एकूण: | रु. 3900.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
5:29 PM ह्या वेळेस मिळेल.

Sub Registrar Kagal

दुय्यम निबंधक श्रेणी-१,
कागल.

बाजार मुल्य: रु.315016 /-
मोबदला रु.320000/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 19200/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.200/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 0325293114520 दिनांक: 29/03/2025
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.500/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 0325297402399 दिनांक: 29/03/2025
बँकेचे नाव व पत्ता:
3) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.3200/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH019019915202425E दिनांक: 29/03/2025
बँकेचे नाव व पत्ता:

मुळ दस्त पक्षकारांना
परत मिळाला.

2

# CHALLAN
## MTR Form Number-6

| | | | |
|---|---|---|---|
| GRN MH019019915202425E | BARCODE | Date 29/03/2025-10:46:43 | Form ID 25.1 |

| | | | |
|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| Type of Payment | Stamp Duty and Registration Fee together | TAX ID / TAN (If Any) | |
| | | PAN No.(If Applicable) | |
| Office Name | KGL_KAGAL SUB REGISTRAR | Full Name | PAUL DAYANAND SONULE |
| Location | KOLHAPUR | | |
| Year | 2024-2025 One Time | Flat/Block No. | RS NO 527/14, 527/15 AND 527/16 PAIKI PLOT |
| | | Premises/Building | NO 5 |

| Account Head Details | Amount In Rs. | | |
|---|---|---|---|
| 0030046401 Stamp Duty | 19200.00 | Road/Street | KASBA KAGAL TAL KAGAL |
| 0030063301 Registration Fee | 3200.00 | Area/Locality | KOLHAPUR |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 1 6 2 1 6 |
| | | Remarks (If Any) | SecondPartyName=ABHINANDAN RAGHUNATH JAKATE~CA=320000~Marketval=320000 |
| Total | 22,400.00 | Amount In Words | Twenty Two Thousand Four Hundred Rupees Only |

दस्त क्र. ८३९ /२०२५
१ / ३४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Payment Details | BANK OF MAHARASHTRA | FOR USE IN RECEIVING BANK | | |
| Cheque-DD Details | | Bank CIN | Ref. No. 02300042025032917645 | 006459219 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date 29/03/2025-10:47:48 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | BANK OF MAHARASHTRA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | Not Verified with Scroll | |

Department ID :

Mobile No. : 9000000000

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1 KAGAL
दुय्यम निबंधक श्रेणी- १, कागल यांची मुद्रा



Print Date 29-03-2025 10:47:51

कागद
दस्त क्र. ८39/२०२५
2 / 34

# Document Handling Charges
## Inspector General of Registration & Stamps

Receipt of Document Handling Charges

| | | | |
|---|---|---|---|
| **PRN :** | 0325297402399 | **Payment Date :** | 29/03/2025 |

Received from **PAUL DAYANAND SONULE**, Mobile number **9284616363**, an amount of Rs.**500/-**, towards Document Handling Charges for the **iSarita 1.9** in the Joint District Registrar office **JDR Kolhapur** of the District **Kolhapur**.

**Payment Details**

| | | | |
|---|---|---|---|
| **Bank Name :** | SBIN | **Receipt Date :** | 29/03/2025 |
| **Bank CIN :** | 10029762025032902235 | **REF No. :** | 4512982718619 |

This is computer generated receipt, hence no signature is required.

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1 KAGAL

# Document Handling Charges
## Inspector General of Registration & Stamps

Receipt of Document Handling Charges

| | | | |
|---|---|---|---|
| **PRN :** | 0325293114520 | **Payment Date :** | 29/03/2025 |

Received from **PAUL DAYANAAD SONULE** , Mobile number **9881424306**, an amount of Rs.**200/-**, towards Document Handling Charges for the **iSarita 1.9** in the Joint District Registrar office **JDR Kolhapur** of the District **Kolhapur**.

**Payment Details**

| | | | |
|---|---|---|---|
| **Bank Name :** | SBIN | **Receipt Date :** | 29/03/2025 |
| **Bank CIN :** | 10029762025032913739 | **REF No. :** | 1259331365019 |

This is computer generated receipt, hence no signature is required.

3

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE. 1
दुय्यम निबंधक श्रेणी- १, कागल यांची मुद्रा
KAGAL

कगल
दस्त क्र. ९३९/२०२५
३ /३४

# ।। खरेदीपत्र ।।

(स्टेज नं.१४:३)

क।। कागल, ता. कागल येथील नगरपरिषद हद्दीतील माझे स्व:कष्टार्जीत मालकी वहिवाटीच्या बिगरशेती खुल्या प्लॉट मिळकतीचे कायम खुष खरेदीपत्र यांची ठरलेली व आजचे बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन किंमत रक्कम रुपये ३,२०,०००/- चे दिनांक २९/०३/२०२५ इ. रोजीचे.

| | | |
|---|---|---|
| १) | पॉल दयानंद सोनुले<br>व.व.५३, धंदा-नोकरी, रा. मातंग वसाहत, कागल, ता.कागल,जि.कोल्हापूर<br>पॅन नंबर : BKMPS9110A<br>आधार नंबर : 7819 4912 7461 | खरेदी घेणार |
| १) | अभिनंदन रघुनाथ जकाते<br>व.व. ३१, धंदा- नोकरी, रा.सणगर गल्ली, कागल, ता.कागल,जि.कोल्हापूर<br>पॅन नंबर : AXPPJ2148C<br>आधार नंबर : 2054 4139 2118 | खरेदी देणार |
| १) | दिनकर कृष्णा जकाते<br>व.व. ७९, धंदा-शेती, रा.सणगर गल्ली, कागल, ता.कागल,जि.कोल्हापूर<br>पॅन नंबर : PWGPJ7885N<br>आधार नंबर : 3897 4560 9556 | मान्यता देणार |
| २) | शुभम गजानन चव्हाण<br>व.व. २९, धंदा-व्यवसाय, रा.कोष्टी गल्ली, कागल, ता.कागल,जि.कोल्हापूर<br>पॅन नंबर : BEXBC7627C<br>आधार नंबर : 5456 5633 2173 | |

कारणे लिहून देतो खरेदीपत्र असे की:-

१) मिळकतीचे वर्णन -

तुकडी व जिल्हा कोल्हापूर, पोटतुकडी व तहसिल कागल ,जिल्हा परिषद कोल्हापूर तहसिल पंचायत समिती कागलपैकी मे.दुय्यम निबंधकसो श्रेणी-१ कागल यांचे अधिकार कक्षेतील क।।कागल,ता.कागल येथील नगरपरिषद हद्दीतील माझे स्व:कष्टार्जीत मालकी वहिवाटीचे बिगरशेती खुल्या प्लॉट मिळकतीचे मिळकतीचे वर्णन :-

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1 KAGAL
दुय्यम निबंधक श्रेणी-१, कागल यांची मुद्रा



कसबा कागल, ता.कागल येथील रि.स.नं.५२७/१४, रि.स.नं.५२७/१५ व रि.स.नं. ५२७/१६ यापैकी भूखंड क्र.१ ते २० चे क्षेत्र २७०८.२४ चौ.मी. पैकी -

| प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | चौ.फुट |
|---|---|---|
| ५ | १२१.१६ | १३०३.९८ |

ची संपूर्ण बिगरशेती खुली प्लॉट मिळकत तुम्हांस या रजि.खरेदीपत्राने कायम खरेदी दिली.

**प्लॉट नंबर ५ च्या चतु:सिमा :-**

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | प्लॉट नं. ६ ची मिळकत |
| पश्चिमेस | - | प्लॉट नं. ४ ची मिळकत |
| दक्षिणेस | - | रि.स.नं.५२७/१७ ची मिळकत |
| उत्तरेस | - | ९ मीटर रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील खरेदी देणार यांचे मालकी वहिवाटीची संपूर्ण प्लॉट मिळकत व त्यामधील आजरोजी असणारे झाड,झुड,जल, तरु, काष्ट, पाषाण,निधी, निक्षेप इ. तदंगभूत वस्तूसह सर्व प्रकारचे इजमेंटरी हक्कासहीत व वहिवाटीच्या हक्कासह खुली प्लॉट मिळकत या खरेदीपत्राचा विषय असून या खरेदीपत्रामध्ये यापुढे या मिळकतीस संक्षिप्त रुपामध्ये त्यास '' **खुली प्लॉट मिळकत किंवा सदर मिळकत**''असे संबोधण्यात आले आहे.

२. सदर मिळकत ही खरेदी देणार यांची कायदेशीर स्व:कष्टार्जीत मालकी व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या ७/१२ पत्रकी खरेदी देणार यांचे नावाची नोंद मालक सदरी झालेली आहे.

३. सदर मिळकत ही निर्वेध व कायदेशीररित्या तबदीलीस पात्र असलेली खरेदी देणार यांचे प्रत्यक्ष मालकी व कब्जेवहिवाटीची मिळकत आहे त्यावर इतर कोणाचाही कसलाही हक्कसंबंध, मालकी वहिवाट नाही. त्यावर अन्य कोणाचाही कर्जबोजा अथवा लागलिगाड नाही. सदर मिळकत तबदिलीच्या मार्गाने तबदिल करणेचा खरेदी देणार यांना पूर्ण हक्क व अधिकार आहे त्यास अनुसरुन खरेदी देणार यांनी खरेदी घेणार यांचे नांवे व हक्कात सदरचे खरेदीपत्र लिहुन दिलेले आहे.

४. सदर मिळकतीबाबत मा.मुख्य अधिकारी कागल नगरपरिषद कागल यांचेकडील नियमाधीन परवाना क्र.३८(३)/२०२२-२३ अन्वये दिनांक ०९/०९/२०२५ इ. रोजीचे गुंठेवारी विकास नियमाधीन प्रमाणपत्र व महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ चे कलम ४, पोटकलम ३ अन्वये सुधारित अधिनियम २०२१ अन्वये सर्व्हे नंबर ५२७/१४, १५ व १६ पै भूखंड क्र.१ ते २० चे क्षेत्र २७०८.२४ चौ.मी. क्षेत्र न.पा.जा.क्र.१५०९/२०२२-२३, दिनांक ०९/०९/२०२२ ने नियमितीकरणाचे रेखांकनास UDRPR मधील नियम क्र.३,४,१ मधील तरतुदी बंधनकारक ठेवून सशर्त मंजुरी मिळालेली आहे. तसेच क्र.कार्या-३/इ/जमीन/अकृषिक आकारणी/एस.आर./५२/२०१५, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचेकडील दि. २०/०२/२०२५ इ. रोजीचा बिगरशेती आदेश घेतलेला असून तो या दस्तासोबत जोडला आहे. तसेच क।।कागल, ता.कागल येथील स.नं.

१८

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE 1 KAGAL
दुय्यम निबंधक श्रेणी- १, कागल

3

| क ग ल |
|---|
| दस्त क्र. ८३१ /२०२५ |
| ५ / ३५ |

५२७/१४,१५,१६ बाबत जा.क्र.४१०७/२०२४, कागल नगरपरिषद कागल यांचे कार्यालयाकडील दि.२६/०३/२०२५ इ. रोजी गुंठेवारी नियमितीकरण रेखांकनातील भूखंड क्र.१ ते ८ चे खरेदी-विक्री कामी ना हरकत दाखला घेतलेला असून तो या दस्तासोबत जोडलेला आहे. तसेच जा.क्र.४१२८/२०२४-२५ कागल नगरपरिषद कागल यांचेकडील दि.२७/०३/२०२५ इ. रोजीचा न.प. अभियंता कागल नगरपरिषद कागल यांनी मा.दुय्यम निबंधकसो श्रेणी-१ कागल यांना ना हरकत दाखला दिलेला असून तो या दस्तासोबत जोडलेला आहे.

५. खरेदी देणार यांनी आपले आत्मगरजेकरिता व कौटुंबिक गरजेकरिता सदर मिळकत विक्री करावयाची होती आणि खरेदी घेणार यांना मिळकतीची आवश्यकता होती, त्यानुसार खरेदी देणार यांनी खरेदी घेणार यांना सदर मिळकत विक्री करणे बाबत उभयपक्षांच्यामध्ये बोलणी व चर्चा झाली. सदर मिळकत खरेदी देणार यांनी खरेदी घेणार यांना रक्कम रुपये ३,२०,०००/-(रुपये तीन लाख वीस हजार फक्त) या बाजारभावानुसार योग्य व पुऱ्या मोबदल्यामध्ये कायम खुष खरेदी देणेचे ठरवुन आजरोजी खरेदी दाखल पुढील नमुद प्रमाणे रक्कम स्विकारुन प्रस्तुतचे खरेदीपत्र लिहून दिलेले आहे.

**मोबदल्याचा तपशिल -**

| रुपये पैसे | तपशिल |
|---|---|
| ३,२०,०००.०० | (रुपये तीन लाख वीस हजार फक्त) खरेदी घेणार यांनी खरेदी देणार यांना बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-कागल या बँकेचा चेक नं.१२७४५६, दि.२८/०३/२०२५ इ. रोजीचे चेकने दिली व ती खरेदी देणार यांना मिळाली असलेने त्याबद्दल तक्रार नाही अगर निराळा भरणा पावतीचे कारण नाही, सर्व भरणा मिळाला. |
| ----------- | |
| ३,२०,०००.०० | (अक्षरी रुपये तीन लाख वीस हजार फक्त) |

६. सदर मिळकत पुर्णपणे निजोखमी असून सदर मिळकत अगर सदर मिळकत खरेदी देणार व मान्यता देणार यांनी कोणासही गहाण, दान अगर बक्षीस दिलेली नाही, अगर खरेदी घेणार यांचे व्यतिरिक्त सदर मिळकत अगर सदर मिळकतीचा कोणताही भाग तबदिल करण्याचा लेखी अगर तोंडी करार आजतागायत केलेला नाही. तसेच सदर मिळकतीचे इतर हक्कात के.डी.सी.सी. बँक लि. कोल्हापूर यांचेकडील जा.क्र.बिगरशेती कर्जे वसुली-२०२४/२५/८८, दि.२९/०३/२०२५ इ. रोजीचे कर्जबोजाबाबत ना हरकत दाखला घेतलेला असून तो या दस्तासोबत जोडलेला आहे. या शिवाय सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही बोजा निर्माण केलेला नाही अगर कोणासही पोटगीचा (मेंन्टेनन्सचा) हक्क दिलेला नाही अगर निर्माण केलेला नाही. याप्रकारे सदर मिळकत बोजारहित व निर्वेध असुन सदर मिळकती संबंधात खरेदी देणार यांना पुर्ण मालकी (Clear & Marketable Title) असल्याची खात्री व भरवसा खरेदी देणार व मान्यता देणार यांनी खरेदी घेणार यांना दिलेला आहे.

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1
दुय्यम निबंधक श्रेणी- १, कागल
KAGAL

कगल
दस्त क्र. ८४३९/२०२५
८ / ३५

७. सदर मिळकत अगर मिळकतीचा कोणताही भाग संपादन(ॲक्वीझीशन)अगर अधिग्रहण (रिक्वीझीशन) करण्यासंबंधीची शासन अगर कोणाकडूनही नोटीस खरेदी देणार व मान्यता देणार यांना आजतागायत आलेली नाही. तसेच सदर मिळकती संदर्भात खरेदी देणार यांचेविरुध्द अगर तर्फे कोणत्याही दादीसंबंधात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही व तशी नोटीसही खरेदी देणार यांना आजतागायत मिळालेली नाही. तसेच खरेदी देणार व मान्यता देणार यांनी ही सदर मिळकतीसंबंधात कोणत्याही न्यायालयात दावा दाखल केलेला नाही.

८. सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध निष्कर्जी, बोजाविरहीत अशी असुन या मिळकती संदर्भात खरेदी देणार व मान्यता देणार यांनी इतर कोणाशीही कोणत्याही प्रकारचा करार, मदार अगर व्यवहार केलेला नाही, हात उसनवार रक्कम घेतलेली नाही अगर हक्क संबंध निर्माण केलेला नाही याची स्पष्ट हमी व खात्री खरेदी देणार व मान्यता देणार यांनी खरेदी घेणार यांना दिलेली आहे.

९. सदर मिळकतीचे आजतारखे पर्यंतचे सर्व प्रकारचे कर, समाईक वर्गणी व तदनुषंगिक देयके खरेदीपत्र खरेदी देणार यांनी मालकी हक्काने भरणा केले आहेत. येथुन पुढचे सर्व कर व देयके मिळकतीचे मालक नात्याने खरेदी घेणार यांनी भरणा करण्याचे आहेत. आज रोजी पर्यंतच्या कराबाबत काही लागलिगाड लागलेस ते खरेदी देणार व मान्यता देणार यांनी स्वखर्चाने दूर करुन देणेची आहेत त्याची कोणतीही तोषिस खरेदी देणार यांनी खरेदी घेणार यांना लागु देणेची नाही.

१०. सदर मिळकतीचा प्रत्यक्ष व खुला कब्जा आजरोजी त्यामध्ये असले झाड,झुड, जल,तरु,काष्ट,पाषाण,निधी,निक्षेप इ.तदंगभूत वस्तूसहीत खरेदी देणार व मान्यता देणार यांनी खरेदी घेणार यांचेकडे मालक नात्याने सुपुर्त केला आहे. तो खरेदी घेणार यांनी आपले वंशपरंपरागत, पुत्रपौत्रादी, मालकी हक्काने उपभोगावा त्यास खरेदी देणार, मान्यता देणार त्यांचे कुटुंबिय अगर त्यांचे तर्फे अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असणार नाही. तशी काही हरकत अगर तक्रार भविष्यात उद्भवलेस ती खरेदी देणार हे स्वखर्चाने दुर करुन देतील, त्याची कोणतीही तोषिस खरेदी देणार व मान्यता देणार यांनी खरेदी घेणार यांना लागु देणेची नाही.

११. खरेदी घेणार हे आजपासून प्रस्तुत खरेदीपत्रानुसार सदर मिळकतीचे खरेदीदार मालक झाले असलेने त्यांनी सदर मिळकतीच्या सरकारी कागदोपत्री आपले नावची नोंद ७/१२ पत्रकी मालक म्हणून करुन घ्यावी. त्याप्रसंगी खरेदी देणार यांच्या सहीची अगर जबाबाची गरज भासलेस ती खरेदी देणार यांनी खरेदी घेणार यांना विना मोबदला व विनातक्रार वेळेत पुर्ण करुन देणेची आहे व आवश्यक ते सहकार्य करणेचे आहे.

१२. यातील खरेदी घेणार हे सदर मिळकतीचे आजपासून खरेदीदार मालक, वहिवाटदार व कब्जेदार झालेले असलेने सदरची मिळकत भविष्यात विक्री/तबदिल करणेचा खरेदी घेणार यांना पुर्ण हक्क व अधिकार आहे.

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1 KAGAL

क ग ल
दस्त क्र. ८३९/२०२५
८/३४



१३. यदाकदाचित भविष्यात सदर मिळकतीसंदर्भात खरेदीपूर्वीच्या वहिवाटीबाबत, चतु:सिमेबाबत अगर कोणत्याही स्वरुपाचा कसलाही वाद अथवा लागलिगाड निदर्शनास आलेस अथवा निर्माण झालेस तो खरेदी देणार यांनी स्व:खर्चाने दूर करणेचा आहे, त्याची तोषीस खरेदी घेणार यांना लागू देणेची नाही.

१४. प्रस्तुतच्या खरेदीपत्राबाबत भविष्यात पुरवणी लेख अगर चूक दुरुस्ती लेखाची गरज भासलेस तसा पुरवणी लेख अगर दुरुस्ती लेख खरेदी देणार व मान्यता देणार यांनी खरेदी घेणार यांना विना विलंब व विना मोबदाला करुन दयावयाचा आहे.

१५. सदर मिळकतीची ठरलेली आजचे बाजारभावाप्रमाणे शासकीय मुल्यांकन रुपये ३,२०,०००/- इतके येत असुन त्यावर आवश्यक तो ई मुद्रांक शुल्क ६% प्रमाणे रक्कम रुपये १९,२००/- व नोंदणी फी १% प्रमाणे रितसर अदा केलेली आहे.

१६. या खरेदीपत्राचा सर्व खर्च, रजिस्ट्रेशन फी, स्टॅम्प डयुटी वगैरे रजिस्ट्रेशनचा सर्व खर्च यातील खरेदी घेणार यांनी संपूर्ण केलेला आहे.

१७. यातील मान्यता देणार यांची सदरचे रजि.खरेदीपत्रास कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार नसून पूर्णपणे सम्मती आहे. म्हणून विनातक्रार मान्यता दिली असे.

१८. सदरचे खरेदीपत्र हे खरेदी देणार, मान्यता देणार व खरेदी घेणार यांनी संपूर्ण मजकूर क्रमश: व कलमश: वाचुन, समजून घेवून, पूर्ण व योग्य मोबदल्यापोटी पुरे केले असुन ते त्यांनी सांगितल्या प्रमाणे तयार केलेले आहे व ते खरेदी देणार, मान्यता देणार व खरेदी घेणार यांना सर्वस्वी मान्य व कबुल आहे.

सदरचे खरेदीपत्र व खरेदीपत्रातील संपुर्ण अटी व शर्ती खरेदी देणार व खरेदी घेणार यांचे सर्व प्रकारचे इस्टेट वारसांचेवर लागु व बंधनकारक आहेत म्हणुन लिहून दिले खरेदीपत्र राजीखुषीने,अक्कलहूशारीने, साक्षीदारांचे समोर समजुन उमजुन, आत्म संतोषाने, विना दडपण कोणाच्याही दडपणाला बळी न पडता आज मुक्काम कागल येथे ता.२९/०३/२०२५ इ रोजीचे. दस्तूर खुद्द.

खरेदी देणार :-

१) (अभिनंदन रघुनाथ जकाते)



मान्यता देणार :- सा.नि.डा.हा.अं. ......... यांचा असे द.

१) (दिनकर कृष्णा जकाते)



THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1
दुय्यम निबंधक श्रेणी-१, कागल यांची मुद्रा
KAGAL

| कागल |
|---|
| दस्त क्र. ६३९ /२०२५ |
| ८ / ६३७ |

मान्यता देणार :-

२) (शुभम गजानन चव्हाण)



खरेदी घेणार :-

१) (पॉल दयानंद सोनुले)



साक्ष

१) अर्जुन बाबासो नाईक
रा.कागल, ता.कागल

२) अभिजीत प्रकाश नाळे
रा.कागल, ता.कागल





6



दस्त क्र. ६३९ / २०२५ दिनांक : 12/03/2025

६ / ३४

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1 KAGAL

दुय्यम निबंधक श्रेणी-१, कागल

महाराष्ट्र शासन

गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ]

गाव :- कागल ( 944742 ) तालुका :- कागल जिल्हा :- कोल्हापुर

PU-ID : 23397435815 गट क्रमांक व उपविभाग : 527/16

23397435815

भू-धारणा पध्दती : भोगवटादार वर्ग -1

| क्षेत्र, एकक व आकारणी | | खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फेरफार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्राचे एकक | हे.आर.चौ.मी | [2528] | ~~[-रघुनाथ-कृष्णा-ककाले~~ | ~~0.24.00~~ | 2.25 | | ( 21665 ) |
| अ) लागवड योग्य क्षेत्र | | | ~~[-सतत-रघुनाथ-ककाले~~ | ~~0.24.00~~ | 2.25 | | ( 29861 ) |
| जिरायत | 0.24.00 | | ~~[-राजश्रीया-विलास-आरडे~~ | | | | ( 29861 ) |
| बागायत | - | | ~~[-मोहिता-विवेक-आरडे~~ | | | | ( 29861 ) |
| एकूण लागवड योग्य क्षेत्र | 0.24.00 | | ~~[-अभिनंदन-रघुनाथ-ककाले~~ | ~~0.24.00~~ | 2.25 | | ( 29861 ) |
| ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य) | | | -------सामाईक क्षेत्र------- | 0.00.00 | | | |
| वर्ग (अ) | 0.01.00 | 62676 | अभिनंदन रघुनाथ ककाले | 0.24.00 | 2.25 | | ( 21665 ) |
| वर्ग (ब) | - | | | | | | |
| एकूण पो.ख. | 0.01.00 | | | | | | |
| एकूण क्षेत्र (अ+ब) | 0.25.00 | | | | | | |
| आकारणी | 2.25 | | | | | | |
| जुडी किंवा विशेष आकारणी | - | | | | | | |

**कुळ, खंड व इतर अधिकार**

कुळाचे नाव व खंड

इतर अधिकार

बोजा - सहकारी सोसायटी इकरार

कागल कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचे कडून 4 लाख कर्जाची नोंद ( 10621 )

बोजा - सहकारी सोसायटी इकरार

श्री छ शाहू वाहनधारक सह पतसंस्था यांचे थकबाकी 121.96/- लाख फक्त कर्ज नोंद 19/06/04 प्रमाणे जमिन हस्तांतरण मनाई ( 11483 )

~~[-बोजा---सहकारी-सोसायटी-इकरार]~~( 24086 )

~~[श्री-शिवशक्ती-पेसा-कागल-शि-बोजा-रु.75000/--]~~ ( 24086 )

हस्तांतरणास बंदी

लता रघुनाथ ककाले यांचे बाबत कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ली कोल्हापूर यांचे थकीत कर्ज र. रु. 1,21,95,540/- बाबत सदरची जमीन गहाण, तारण, विक्री, बक्षीस, हस्तांतरण, बोजा करणेस मनाई ( 27817 )

प्रलंबित फेरफार : नाही.

शेवटचा फेरफार क्रमांक : 29861 व दिनांक : 19/08/2024

जुने फेरफार क्र. : ( 257 )( 5782 )( 5785 )( 7178 )( 10621 )( 11483 )( 20798 )( 21665 )( 22716 )

सीमा आणि भुमापन चिन्हे :

सदर ७/१२ हा ई-मेल भूमापन ई-हक्क ...

गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम १९७१ यातील नियम २९ ]

गाव :- कागल ( 944742 ) तालुका :- कागल जिल्हा :- कोल्हापुर

गट क्रमांक व उपविभाग : 527/16

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | हे.आर. चौ.मी | हे.आर. चौ.मी | | | हे.आर. चौ.मी | |
| 2023-24 | संपूर्ण वर्ष | 2528 | निर्भेळ | ऊस | 0.2400 | | | | | |

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले "

दिनांक :- 27/03/2025

सांकेतिक क्रमांक :- 27340008042443000003202512060

ग्राम महसूल अधिकारी

( ... )

साझा :- कागल तालुका :- कागल जि :-कोल्हापूर

दस्तांक कागल

ता. कागल, जि. कोल्हापूर

7

महाराष्ट्र शासन

# गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

गाव :- कागल ( २४४७४२ ) तालुका :- कागल जिल्हा :- कोल्हापुर

PU-ID : 30351785516 गट क्रमांक व उपविभाग ५२७/१५ 30351785516

भुधारणा पद्धती भोगवटादार वर्ग -१ शेताचे स्थानीक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. | भोगवटादाराचे नाव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फेरफार क्र | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी | ३१६० | दिनकर कृष्णा जकाते | ०.०६.०० | ०.५६ | | ( ६६१३ ) | कुळाचे नाव व खंड |
| अ) लागवड योग्य क्षेत्र<br>जिरायत ०.०६.००<br>बागायत -<br>- <br>ला.यो. क्षेत्र ०.०६.०० | | | | | | | इतर अधिकार<br>बोजा - मुद्रांक शुल्क<br>मुद्रांक शुल्क येणे र.रु. ७३५०/- + दंड ५९००/- + १४५०/- + ११८००/- ( १२१४५ ) |<br>बोजा - गहाणखत<br>श्रीनाथ ना.सह.पत संस्था मर्या कागल र रु.४,००,०००/- ( १६४८२ ) |
| ब) पोटखराब क्षेत्र<br>(लागवड अयोग्य)<br>वर्ग (अ) -<br>वर्ग (ब) -<br>एकुण<br>पो.ख.क्षेत्र ०.००.०० | | | | | | | प्रलंबित फेरफार : नाही. |
| एकुण क्षेत्र ०.०६.००<br>(अ+ब) | | | | | | | शेवटचा फेरफार क्रमांक : २२२१० व दिनांक : ११/०५/२०१८ |
| आकारणी ०.५६ | | | | | | | |
| जुडी किंवा विशेष आकारणी | | | | | | | |

कगल

दस्त क्र. ८३९ /२०२५

१० / ३५

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1

दुय्यम निबंधक श्रेणी- १, कागल यांची मुद्रा

सत्यमेव जयते

KAGAL

जुने फेरफार क्र : (११८) (६६१३) (१२१४५) (१२१७१) (१६४८२) (२०७७८) (२२२१०)

सीमा आणि भुमापन चिन्हे :

सदर सर्व्हे हा नगर भुमापन हदीत आहे.

हा गाव नमुना क्रमांक ७ दिनांक ०७/०१/२०२०:१०:३५:१० PM रोजी डिजिटल स्वाक्षरीत केला आहे व गाव नमुना क्रमांक १२ चा डेटा स्वयंप्रमाणित असल्यामुळे ७/१२ अभिलेखावर कोणत्याही सही शिक्क्याची आवश्यकता नाही.



७/१२ डाउनलोड दि. : २३-०९-२०२४ : १३:३५:५७ PM. वैधता पडताळणीसाठी https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dsr/ या संकेत स्थळावर जाऊन 340810000110375५ हा क्रमांक वापरावा.

Digitally signed

# गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ यातील नियम २९ ]

गाव :- कागल (५४४७४२) तालुका :- कागल जिल्हा :- कोल्हापुर

गट क्रमांक व उपविभाग ५२७/१५

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | हंगाम | खाते क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | हे.आर.चौ.मी | हे.आर.चौ.मी | | | हे.आर.चौ.मी | |
| २०१७-१८ | खरीप | | निर्भेळ | ऊस | ०.०६०० | | | | | |
| २०१८-१९ | खरीप | | निर्भेळ | ऊस | ०.०६०० | | | | | |
| २०१९-२० | खरीप | | निर्भेळ | ऊस | ०.०६०० | | | | | |

टीप :** सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

कगल
दस्त क्र. ८३९ /२०२५
११ / ३५

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1 * KAGAL *
दुय्यम निबंधक श्रेणी- १, कागल

4



क ग ल
दस्त क्र. ९३९ /२०२५
92 / 39

THE SEAL OF THE SUB REGISTRAR GRADE-1 KAGAL

अहवाल दिनांक : 12/12/2024

महाराष्ट्र शासन
गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )
[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम ३,५,६ आणि ७ ]

गाव :- कागल ( 944742 )
PU-ID : 36338937033
तालुका :- कागल
गट क्रमांक व उपविभाग : 527/14
जिल्हा :- कोल्हापुर
36338937033

भू-धारणा पध्दती : भोगवटादार वर्ग -1
शेताचे स्थानिक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | | खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्राचे एकक | हे.आर.चौ.मी | [498] | [illegible] | | | | | कुळाचे नाव व खंड |
| अ) लागवड योग्य क्षेत्र | | | [illegible] | | | | ( 29993 ) | इतर अधिकार |
| जिरायत | 0.03.00 | | [illegible] | | | | ( 29993 ) | प्रलंबित फेरफार : नाही. |
| [illegible] | - | | [illegible] | | | | ( 29993 ) | शेवटचा फेरफार क्रमांक : 29993 व दिनांक : 05/11/2024 |
| एकूण ला.यो. क्षेत्र | 0.03.00 | | [illegible] | | | | ( 29993 ) | |
| ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य) | | | [illegible] | | | | ( 29993 ) | |
| वर्ग (अ) | - | | [illegible] | | | | ( 29993 ) | |
| वर्ग (ब) | - | | [illegible] | | | | ( 29993 ) | |
| एकूण पो.ख. | 0.00.00 | | [illegible] | | | | ( 29993 ) | |
| एकूण क्षेत्र (अ+ब) | 0.03.00 | | [illegible] | | | | ( 29993 ) | |
| आकारणी | 0.28 | | [illegible] | | | | ( 29993 ) | |
| | | | -------सामाईक क्षेत्र------- | 0.00.00 | 0 | | ( 29993 ) | |
| जुडी किंवा विशेष आकारणी | - | 62720 | शुभम गजानन [illegible] | 0.03.00 | 0.28 | | ( 29993 ) | |

जुने फेरफार क्र. ( 1041 )( 8112 )( 11033 )( 19485 )( 19486 )( 20778 )( 22210 )( 29335 )

सीमा आणि भुमापन चिन्हे :

सदर ७/१२ हा नगर भूमापन हद्दीत आहे.

गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )
[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ]

गाव :- कागल ( 944742 )
तालुका :- कागल
गट क्रमांक व उपविभाग : 527/14
जिल्हा :- कोल्हापुर

| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाखालील क्षेत्राचा तपशील: पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन: स्वरूप | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | हे.आर.चौ.मी | हे.आर.चौ.मी | | | हे.आर.चौ.मी | |
| 2015-16 | खरीप | | निर्भेळ | ऊस | 0.0300 | | | | | |
| 2016-17 | खरीप | | निर्भेळ | ऊस | 0.0300 | | | | | |
| 2017-18 | खरीप | | निर्भेळ | ऊस | 0.0300 | | | | | |
| 2018-19 | खरीप | | निर्भेळ | ऊस | 0.0300 | | | | | |
| 2019-20 | खरीप | | निर्भेळ | ऊस | 0.0300 | | | | | |
| 2023-24 | खरीप | 498* | निर्भेळ | [illegible] | 0.0300 | | [illegible] | | | |

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."
दिनांक :- 27/03/2025
सांकेतिक क्रमांक :- 27340008042443000003202512059

ग्राम महसूल अधिकारी
ग्राम महसूल अधिकारी सज्जा :- कागल तालुका :- कागल जि :-कोल्हापूर
कसबा कागल
ता. कागल, जि. कोल्हापूर

# जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

स्वराज्य भवन नागाळा पार्क, ता.करवीर, जि.कोल्हापूर

Email- rdckop@gmail.com Phone No. 0231-2654812


क्र. कावि/इ/जमीन अकृषिक आकारणी/ एस.आर.- 52/2025 दिनांक: 20/02/2025

वाचले :-

1. श्री.अभिनंदन रघुनाथ जकाते, कसबा कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांचा दिनांक 22/10/2024 चा अर्ज
2. तहसिलदार कागल यांचेकडील क्र.जमीन/कावि/53/2025 दि.24/01/2025 चा अहवाल
3. मुख्याधिकारी, कागल नगरपरिषद, कागल यांचेकडील जा.क्र.1510/2022-23 दि.09/09/2024 चे पत्र
4. मुख्याधिकारी, कागल नगरपरिषद, कागल यांचेकडील रेखांकन मंजूर परवाना नियमाधीन परवाना क्र. क्र.38(2)/ 22-23 दि.09/09/2022 चे प्रमाणपत्र जा.क्र. 1509/23-23 दि.09/09/2022
5. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 मधील कलम 42 अ
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील सन 2014 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 17 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश दिनांक 22 ऑगस्ट, 2014 व 22 जा 6. जानेवारी 2016 च्या शासन निर्णय.
7. अर्जदार यांचे दि.05/ 02/2025 चे प्रतिज्ञापत्र.
8. इकडील दि.14 / 02/2025 ची मंजुर टिपणी
9. स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा कोल्हापूर यांचेकडे भरलेले चलन क्र. GRN MH016262474202425E दिनांक 17/02/2025 व डिफेस क्र. 0009057364202425 दि.18/02/2025

कागल

दस्त क्र. ९३९ /२०२५

९३ / ३५

## -: आदेश :-

विषय :- का कागल ता.कागल येथील स.नं. ५२७/१४, १५, १६ पै. ३४०० चौ.मी. (भूखंड क्र. १ ते २० चे २७०८.२४ चौ.मी.) क्षेत्राची अकृषक आकाराणी होऊन निवासी प्रयोजनार्थ विकास परवानगी नाहरकत दाखला मिळणेबाबत..

श्री.अभिनंदन रघुनाथ जकाते, कसबा कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर.

उपरोक्त वाचले क्र.1 अन्वये अर्जदार यांनी मुख्याधिकारी कागल नगरपरिषद् कागल यांचेकडे दाखल केले अर्जाच्या अनुषंगाने कसबा कागल, ता.कागल येथील स.नं. ५२७/१४, १५, १६ पै. ३४०० चौ.मी. (भूखंड क्र. १ ते २० चे २७०८.२४ चौ.मी.) क्षेत्राची अकृषक आकाराणी होऊन निवासी प्रयोजनार्थ या क्षेत्रास विकास परवानगी ना हरकत दाखला मिळणेबाबत मागणी केली होती.

प्रकरणी तहसिलदार कागल यांनी मंडळ अधिकारी कागल यांचेकडून चौकशी व पंचनामा करुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवालास अनुसरुन तहसिलदार कागल यांनी वाचले क्र. २ अन्वये अहवाल सादर केला असून सदर अहवालानुसार

सदर प्रकरणी प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन पंचनामा व अर्जदार यांचे जाब-जबाब नोंदविणेत आलेले आहेत. प्रत्यक्षात सदर जागेवरती कोणत्याही प्रकारचे बांधकाम झालेचे दिसून येत नाही. तसेच सदर जागेचा वापर अकृषक कारणासाठी होत नाही असे दिसून येते. सदर प्रकरणी कागल, ता. कागल येथील स.नं. ५२७/१४, १५, १६ पै. ३४०० चौ.मी. (भूखंड क्र. १ ते २० चे २७०८.२४ चौ.मी.) इतके असून यापैकी श्री.अभिनंदन रघुनाथ जकाते यांचे मालकी वहीवाटीचे ०.३४.०० हे. आर इतके क्षेत्र आहे.

१. कसबा कागल येथील गट नं. ५२७/१४ चे क्षेत्र ०.०३ हे. आर असून भोगवटदार सदरी शुभम गजानन चव्हाण यांचे नाव आजरोजी दाखल आहे. सन १९५६-५७ चे ७/१२ उतारेनुसार सदर जमिन नरसाप्पा मालेश कुंभार यांचे नावे असलेचे दिसून येते, फेरफार क्रमांक ११४८५ नुसार वारसाने रजाबाई शंकर कुंभार, भीमसेन शंकर कुंभार, अर्जुन शंकर कुंभार, रुक्मिणी महादेव कुंभार यांची नवे दाखल झालेली आहेत. फेरफार क. २९९९२ दिनांक ४/१०/२०२४ नुसार खरेदीने ७/१२ सदरी श्री शुभम गजानन चव्हाण यांचे नाव दाखल आहे.

२. कसबा कागल येथील गट कमांक 527/15 चे क्षेत्र 0.06.00 हे. आर असून आजरोजी श्री दिनकर कृष्णा जकाते यांचे नावे असून सन 1956-57 चे उतारेनुसार सदरचे क्षेत्र कलाप्पा तीपांना कुंभार यांचे नावे असलेचे दिसून येते फेरफार क्रमांक 6613 दिनांक 1/6/1988 नुसार सदर क्षेत्रास खरेदीने श्री दिनकर कृष्णा जकाते यांचे नाव दाखल झालेचे दिसून येते.

3. कसबा कागल येथील गट क्रमांक 527/16 चे क्षेत्र 0.24.00 हे. आर व पोट खराब 0.01.00 हे. आर असून आजरोजी श्री अभिनंदन रघुनाथ जकाते यांचे नाव आहे. सदर जमिनीचे इतर अधिकारामध्ये श्री छ. शाहू वाहनधारक ग्रह. पतसंस्था यांचे थकबाकी 121.96/- लाख फक्त कर्ज नोंद दिनांक 16/6/2004 प्रमाणे जमिन हस्तांतरण मनाई फेरफार क्र. 11483 ने नोंद आहे. सदर गटाचे इतर अधिकारामध्ये लता रघूनाथ जकाते यांचे यांचे बाबत कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कोल्हापूर यांचे थकीत कर्ज रक्कम रु. 1,21,95,540/-, बाबत सदरची जमिन गहाण तारण, विक्री, तबदील हस्तांतरण बोजा करणेस मनाई फेरफार क्रमांक 27817 ने करणेत आलेली आहे. सन 1956-57 चे उतारेनुसार सदरची जमिन गोपाळ रामा जकाते ए.कु.पु. यांचे नावे असलेचे दिसून येते. फेरफार क्रमांक 7178 दिनांक 10/9/1991 नुसार बक्षीस पत्राने मान्यता घेऊन सदर क्षेत्रास रघुनाथ कृष्णा जकाते यांचे नाव दाखल झाले आहे. वारसा फेरफार क्र. 21665 दिनांक 2/11/2017 नुसार लता रघुनाथ जकाते, राजशीला विकास पाटील, योगिता बिवेक घाटवडे व अभिनंदन रघुनाथ जकाते यांचे नाव 7/12 सदरी दाखल झाले आहे. फेरफार क्र. 29861 दिनांक 2/08/2024 नुसार रजिस्टर हक्कसोडपत्राने लता रघुनाथ जकाते, राजशीला विकास पाटील, योगिता विवेक घाटवडे यांची नावे कमी होऊन 7/12 सदरी अभिनंदन रघुनाथ जकाते यांचे नाव 7/12 सदरी दाखल झाले आहे.

सदर गट क्रमांक 527/14 गट क्रमांक 527/15 व गट कमांक 527/16 चे आजरोजी 7/12 सदरी नावे दाखल असलेल्या खातेदारांचे जबाब प्रकरणी पान नं.121 यास असून त्यानुसार भूखंडावर कोणतेही बांधकाम नसून जमिनीचे निवासी प्रयोजनासाठी शासकीय नियमानुसार होणारे शुल्क भरणेस तयार असलेबाबत नमूद आहे. प्रकरणी पान नं 123 वर स्थळ पाहणी पंचनामा सामील असून त्यामध्ये चतुः सिमा नमूद आहेत. सदर भूखंडावर कोणतेही बांधकाम नाही.

सदर जमिनीचे 7/12 व फेरफार उतारे तसेच मंडळ अधिकारी यांचे अहवालानुसार सदरची जमिन भोगवटदार वर्ग 1 असून अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे निवासी कारणासाठी बिगरशेती करून देणेस हरकतीचे नाहीअसे नमूद करुन कळविलेले आहे.

वरील वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता कसबा कागल, ता. कागल येथील स.नं. ५२७/१४, १५, १६ पै. ३४०० चौ.मी. (भूखंड क्र. १ ते २० चे २७०८.२४ चौ.मी.) क्षेत्राचे अकृषक आकारणी होऊन विकास परवानगीकामी नाहरकत दाखला देणेस हरकत नाही

प्रत्यक्षात सदर जागेवरती सर्व क्षेत्र पड असून आज रोजी सदर जमिनीमध्ये कोणत्याही प्रकारचे पिक नाही सदर जागेचा वापर अकृषक कारणासाठी होत नाही. तरी सदर प्रकरणी अर्जदार यांचे मागणी नुसार अकृषक आकारणी करुन देणेस हरकतीचे नाही असे इकडील मत आहे.

